भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. १३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०६/०१/२०१८

**१) संगनमत करुन भांडण करुन डोक्यावर विटाने मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०५/०१/२०१८ चे १०.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी विशाल धनराज गभणे वय २६ वर्ष, रा. डोंगरगाव हा आपले मित्र अश्विन शामु भोंडे रा. डोंगरगाव याचे सोबत मोटार सायकलने तांदळाची चुंगडी घेवन जात असतांना यातील आरोपी क्र. १ हा सायकलने गाडी समोर आल्याने त्याचे हात पकडुन त्याचे नाव विचारले असता आरोपी क्र. १ ने फिर्यादी सोबत भांडण करुन व आरोपी क्र. २ ने फिर्यादीचे मित्राला मारपीट करुन ढकलढुकल केल्याने फिर्यादीचे डोक्यावर आरोपी क्र. १ ने विटाने मारुन जखमी फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ३२४,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सिंधीमेश्राम पोलीस स्टेशन मोहाडी हे करीत आहेत.

**२) संगनमत करुन मुलाला अडवुन थापड बुक्यांनी मारुन शिवीगाळ करुन पाहुन घेण्याची धमकी दिली . :—**

दिनांक ०५/०१/२०१८ चे १०.३० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी ज्ञानेश्वर किरण पाथरे वय ४२ वर्ष, रा राजेन्द्र वार्ड मोहाडी याचा मुलगा रजत पाथरे वय १५ वर्ष, रा. हा सायकलने शाळेत जात असता यातील आरोपी क्र. १ ने त्याची मोटार सायकल ही दारु पिवुन आडवी तीडवी चालवुन त्याचे सायकल समोर आणली मुलगा आपली सायकल घेवुन तेथुन निघुन जात असतांना आरोपीतांनी संगनमत करुन त्याचा हात पकडुन त्याला अडवुन थापड बुक्यांनी मारुन शिवीगाळ करुन पाहुण घेण्याची धमकी दिल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ३४१,३२३,५०४,५०६,३४ भादवी. सहकलम १८४,१८५ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गिऱ्हेपुंजे पोलीस स्टेशन मोहाडी हे करीत आहेत.

**३) मोटार सयकलच्या धडकेत महिला जखमी . :—**

दिनांक ०५/०१/२०१८ चे १४.०० वाजता. दरम्यान यातील जखमी फिर्यादी मारोती मोतीराम शहारे वय ६० वर्ष, रा. किरमटी हा आपले मोटार सायकल क्र. एमएच ३६ ई १०३७ ने पत्नी सौ. महानंदा मारोती शहारे रा. किरमटी हीला मागे बसवुन गावाकडे जात असतांना मागेहुन येणाऱ्या यातील अनोळखी आरोपी मोटार सायकल चालकाने त्याचे ताब्यातील ही हयगयीने, निष्काळजीपणे चालवुन मागेहुन लाखांदुर राजेन्द्र ट्रेडर्स जवळ येथे धडक दिल्याने फिर्यादी व त्याचे पत्नीला जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने जखमीचे बयान व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम २७९,३३७,३३८ भादवी. सहकलम १३४(ब)/१७७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. खंडाते पोलीस स्टेशन लाखांदुर हे करीत आहेत.

**४) औषधोपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु . :–**

दिनांक ०३/०१/२०१८ चे १४.३० वाजता पुर्वी यातील मृतक प्रेमदास वासुदेव उरकुडकर वय ५२ वर्ष, रा. वैजेश्वर वार्ड पवनी याची अचानक प्रकृती बिघडल्याने त्यास औषधोपचारा करीता सा. रु. भंडारा येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉ. मेमो वरुन पो.स्टे भंडारा येथे मर्ग क्र. ००/१८ क. १७४ जाफौ. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. कोडवते यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मस्के पो.स्टे पवनी हे करीत आहेत.

**५) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक ०५/१२/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ७७ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी – ०३, तीन सिटर वाहनांवरती– ०९ केसेस व ईतर वाहनांवरती –६५ केसेस करण्यात आले आहे.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.